# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/१०/२०१६

**१) संगनमत करुन बिना परवाना ४ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/१०/२०१६ रोजी ०५.३० वा. दर. यातील फिर्यादी हा पोलीस स्टॉपसह पोलीस जिपने पो. स्टे. परिसरात पेट्रोलीग करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये बिना परवाना रॉयल्टी नसुन सुध्दा ४ ब्रास रेती कि. ८,०००/—रु. ची चोरीने पाचगाव फाटा येथुन चोरुन नेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हलमारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९, १०९ भादंवि. सहकलम २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) रेती चोरीच्या कारणावरुन महीलेस जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक २६/१०/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील रुयाळ रेती घाटावरुन ट्रक्टरने रेती चोरी करीत होते म्हणुन यातील फिर्यादी सरपंच ही गावातील लोकांसोबत रेती घाटावर जाऊन ट्रॅक्टर मध्ये रेती भरुन रेती चोरी करण्याचा प्रयत्न करीत असतांना फिर्यादीला दिसल्यामुळे फिर्यादीने यातील आरोपीतांना हटकले असता त्यांनी संगनमत करुन तुम्हाला काय करावे लागते तुम्हाला वाटत असेल तर तुम्हीच ट्रॅक्टर घ्या व रेती चोरा असे म्हणुन शिवीगाळ करुन तुम्ही जर आता समोर आल्यातर तुम्हाला जिवाने मारुन टाकु अशी धमकी देवुन आरोपी क्र. ५ हा पावडा घेवुन मारण्यास धावल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,५११,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) शिक्षकाने मुख्याध्यापकाचा फायदा घेवुन शासनाच्या रक्कमेचा अपहार केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०२/२०१६ चे पुर्वी. यातील आरोपी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय चिचाळ/बारव्हा येथे शारीरीक शिक्षक या पदावर असुन आरोपीने फिर्यादी प्रभारी मुख्याध्यापक याची लॅगिंग आयडी व पासवर्ड चोरुन थकीत वेतनाचे बिल जनरेट करुन मुख्याध्यापकांचे जागी स्वतः सही करुन शिक्षणाधिकारी यांचे कडे स्वतः वेतन बिल सादर करुन व मंजुर करुन १८,११,३६७/—रु. ची उचल करुन शासनाच्या रक्कमेचा अपहार केल्याने फिर्यादी हंसराज नत्थुजी जांभुळकर वय ५६ वर्ष, रा. समता कॉलोनी अर्जनी/मोर यांचे लेखी रिपोर्ट व सहा. अभियोक्ता भंडारा यांचे अभिप्राया वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४६८,४७१,१२०(ड) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) बनावट नोटा वापर करुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १२/०२/२०१६ ते ०५/०९/२०१६ दर. यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने बॅकेत ५,००/—रु. चे ०९ नोटा व १,०००/—रु. ची १ नोट असे एकुण कि. ५,५००/—रु. च्या बनावट नोटा असल्याचे माहीती असुन देखली जानीवपुर्वक अपव्यापर करण्याचे उद्येशाने तिचा अभिसरण करुन संतोष फायदा मिळविल्याने फिर्यादी रज्जीत कुमार दास वय ५७ वर्ष, रा. जलाराम चौक भंडारा (मुख्य प्रबंधक एस. बी. आय बॅक भंडारा) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४८९(ब) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १६/१०/२०१६ ते २६/१०/२०१६ दर. यातील आरोपीने फिर्यादी अल्पवयीन मुलीस वैयक्तीक परिचय व जवळीक साधण्याचे हेतुने तिची ईच्छा नसतांना वारंवार पाठलाग करुन तसेच संपर्क साधुन तु माझ्यावर प्रेम करते किंवा नाही ते २ ते ४ दिवसात सांग नाहीतर कापुन टाकीन असे बोलुन विनयभंग करुन जिवाने मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४(ड)(२),५०६ भादंवि. सहकलम १२ बा. लै.अ.सं.अधी २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २७/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, कारधा, वरठी, करडी, तुमसर, सिहोरा, गोबरवाही व साकोली येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन १३७ लिटर हातभट्टी +सडवा साहित्य कि. ११,७१०/–रू. व देशी दारु ४ लिटर ८३० मिली देशी दारु कि. १,३००/–रु. तसेच जुगारातुन कि. १,२०,०८०/–रु. चा माल असा एकुण कि. १,३३,९००/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.